

# गाव सुधारू लागले!

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IPBK-0106248
IRBK-0106248



जगताप-कारले प्रकाशन पुणें

६२८८
९।-

ग्रामविकास माला

पुष्प दुसरें

# गाव सुधारू लागले !

अनुक्रम ३९७५९
विभाग ग्रामविकास ७५१
क्रमांक ८९८
नों. दि. १५।१२।५८

लेखक

रा म त न य

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६२८८ नों. दि. ...........
वि. ग्रा-वि क्र. ...........

IRBK-0106248

IRBK-0106248

किंमत ८ आणे

: प्रकाशक :

**स. आ. जगताप**

जगताप-कारले प्रकाशन,
१९२ शुक्रवार, पुणें २

: मुद्रक :

**मा. र. कारले**

जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार, पुणें २.

अनुक्रम २१७६१
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ६४४
नों. दि. ९।४।२१५०

# लेखकाचें निवेदन

**गाव सुधारू लागले !** हें ग्रामविकास मालेंतील दुसरें पुष्प आहे. पहिल्या पुष्पांत गावांतील जमिनीस शास्त्रीय पद्धतीनें ताली घातल्यानें कसा फायदा होतो, हें दाखविलें आहे. तथापि धान्य पिकलें तरी लोकांच्या इतर गरजा भागण्यासाठीं त्यांना जो पैसा लागतो, तोही ग्रामसुधारणेंत निर्माण झाला पाहिजे. या पुष्पांत तो पैसा संपादण्याचा मार्ग दाखविला आहे.

घायाळाची लागवड करणें हा पहिला उपाय सुचविला असून तालींच्या कडेला ही लागवड केल्यानें दुहेरी फायदा कसा होतो हें या पुस्तकांत स्पष्ट केलें आहे.

दुसरें महत्त्वाचें पीक भुईमुगाचें होय. त्याची लागवड नवीन पद्धतीनें केल्यानें उत्पादन कसें वाढतें, याची रूपरेखा या पुष्पांत दिलेली आहे.

याशिवाय मेंढ्या पाळणें, कोंबड्या पाळणें यांपासून होणारे फायदे शेतकऱ्यांना कसे मिळवितां येतात, हेंही ओघाओघानें मांडलें आहे.

तरडगावासारखें नापीक गांव सुपीक होऊं लागलें. त्यामुळें तेथें अधिक सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू झाल्याची कल्पना या पुस्तकांत आहे.

अशाप्रकारें वास्तववादी विवेचन या पुष्पांत असल्यानें यास जनता व सरकार यांचा भरपूर आश्रय मिळेल आणि लेखक व प्रकाशक यांच्या परिश्रमांचें चीज होईल असा भरंवसा लेखकास वाटतो.

विजयादशमी
शके १८७८

—रामतनय

# अनुक्रमणिका


१. धान्य पिकले—पण ? ...... ५

२. घायपाताचे उपयोग ...... ८

३. आनंदरावांचा सल्ला ...... १५

४. पिराजीचे गाणे ...... २१

५. भुईमूग चांगला पिकला ...... २५

६. नव्या नव्या सुधारणा ...... २८

# गाव सुधारू लागले!

अनुक्रम २७०८६
विभाग ग्यालवाङ्
क्रमांक ५५४
नों. दि. ९३।२

## १. धान्य पिकले—पण ?

तालीचे गाव म्हणून तरडगावचा लौकिक तालुक्यात पसरण्यास फार वेळ लागला नाही. लोकानी आपापसात सहकार्य करून जमिनीस ताली घालण्याचे काम केलेले आहे, हे तालुक्याच्या अधिकाऱ्यानी पाहिले. कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यानी तरडगावच्या कार्याची सूक्ष्मपणे पाहाणी करून तसे काम सर्व ठिकाणी कसे चालू करता येईल, याचा विचार चालविला.

'लोकसेवा' या वर्तमानपत्राच्या संपादकानी स्वतः तरडगावी येऊन तालीच्या कामाचे महत्त्व समजावून घेतले आणि त्यानी आपल्या पत्रात पुढील मजकुराचे स्फुट लिहिले.

"तरडगावच्या लोकानी आपल्या शेतात ताली घातल्यामुळे जमिनीची सुधारणा झालेली आहे. सरकारही ताली घालण्याचे काम करीत असते. पण त्यासाठी होणारा खर्च जमिनीच्या मालकाना द्यावा लागतो.


या गावी श्रीपतराव या कार्यकर्त्यांच्या उपदेशाने

लोकाना सहकार्याचे महत्त्व पटले आणि तेथील जनतेने श्रमदान करून सबंध गावाचे शिवार तालींनी बांधून टाकले आहे.

या कामगिरीमुळे दुष्काळी तरडगावाचे स्वरूप सुकाळी तरडगाव असे पालटले आहे.

यासाठी तरडगावच्या जनतेचे आम्ही अभिनंदन करतो. सर्व ठिकाणी असेच काम झाल्यास धान्याचा दुष्काळ या प्रदेशात तरी पडणार नाही, असा आम्हास भरंवसा वाटतो."

लोकसेवा पत्रातील या शिफारशीमुळे तरडगावच्या ताली पाहाण्यास गावोगावचे लोक येऊ लागले. त्या



लोकाना गणपत पाटील सर्व प्रकारची माहिती देत होते.

गावच्या सर्व लोकानी एकजुटीने सहकार्य करून गावच्या शिवारातील सगळ्या जमिनीना ताली घातल्या. त्या ताली श्रीपतरावांच्या देखरेखीखाली झाल्यामुळे जशा पाहिजे तशा झाल्या.

तरडगावास श्रीपतरावासारखा थोर माणूस पुढारी मिळाला होता. गणपत पाटील सरळ मनाचे असून समंजस होते. गावच्या लोकांचा फायदा कसा होईल, याकडे त्याचे लक्ष होते. त्यांचेही पवार घराणे मोठे होते. त्यांच्या वाट्याला बरीच जमीन आलेली होती. ताली घातल्यामुळे ती जमीन चांगली पिकू लागली.

आपल्या गावची सुधारणा झाली पाहिजे, अशी गणपत पाटलांची इच्छा होती. त्याना तुकारामा-सारख्या सचोटीने वागणाऱ्या लोकांचे पाठबळ होते. त्यामुळे तालींची कामे होऊन गावच्या लोकाना पोटभर अन्न मिळू लागले.

पण एवढ्यानेच कांही तेथील लोकांची चांगली गुजराण होत नव्हती. त्याना कपडालत्ता घेण्यास पैशाची जरुरी लागत होती. तेल, मीठ, मिरची घेण्यासाठी पैसा लागत होता. सणासुदीसाठी गोड जेवण करावयाचे ठरविले, तर त्यालाही पैसा लागतच होता. शेतीच्या औतास, बैल खरेदी करण्यास पैसा लागत होता.

आणखी अशा कितीतरी बाबींसाठी लोकाना पैसा लागत असतो. शेतात उत्पन्न होणारे धान्य विकूनच त्याना पैसा उभा करावा लागत असतो. हे धान्यही त्याना बाजारात नेऊन विकावे लागते. घडूत कुडते घेण्यासाठी बाजारात रोख पैसा पडत असल्यामुळे ज्वारी बाजरी त्याना स्वस्त दराने विकावी लागत असते.

शिवाय सरकारी धारा शेतकऱ्याना रोकडीतच द्यावा लागतो. ही रोकड मागण्यास पूर्वी शेतकरी सावकाराकडे जात असत. पण आता नवीन कायद्यामुळे सावकार सावकारी करीतनासे झाले. मग शेतकऱ्याना पैसा मिळण्यास अडचण पडू लागली.

## २. घायपाताचे उपयोग

आता ही पैशाची चणचण कशी भागवावी याची काळजी तरडगावच्या लोकाना उत्पन्न झाली.

गुढी पाडव्याच्या दिवशी कांही तरी नव्या कामास सुरुवात करावी या हेतूनें श्रीपतरावांच्या वाड्यात गावचे सारे लोक जमले होते.

श्रीपतरावांच्या घरात पहिल्यापासून अस्पृश्यता

मानीत नसत. महारवाडा, मांगवाडा गावाबाहेर असला तरी तेथील मंडळी शेतकामासाठी श्रीपतरावांच्या वाड्यात येत असत. जनावरांचा शेणगोठा ते लोक करीत असत. दुसऱ्या गडी माणसाबरोबर ते भाकरी तुकडाही खात असत. गुढी पाडव्याच्या दिवशी हीही मंडळी गावकऱ्यात येऊन बसली होती. त्यावेळी तुकाराम म्हणाला,

"श्रीपत काका, आपल्या गावात पोटापुरता जोंधळा व बाजरी पिकते, पण धडूत कापरूण घेण्याला पैसा पुरत नाही. तो पैसा कमाविण्यासाठी म्हमई, सोलापूरला गिरणीत कामाला गेले कीं, इकडे शेताची मेहनत होत नाहीं. याला उपाय काय तो शोधला पाहिजे ना ?"

एक म्हातारा शेतकरी म्हणाला,

"तुमी लई कपडा घेता. आमाला एक लंगोटी आन घोगडं असलं की भागतं. आमच्या लहानपणी आमचा कोस्टी हतंच कापड विणीत होता. त्याला चार पायली जोंधळा दिला, म्हणजे कामापुरत कापड त्यो देत व्हता. आता कोस्ट्याचे कापड खपना, म्हनून-शान तो गाव सोडून गेलाया !"

श्रीपतराव म्हणाले, "या शेतकरी बाबांचें

म्हणणे खरे आहे. पण आता लंगोटीवर भागण्याचे दिवस नाहीत. नेसायला जाडे भरडे का होईना, धोतर पाहिजे. अंगांत चांगली जाड कुडती पाहिजेत. डोक्याला पागोटे पाहिजे. नाहीतर खादीची टोपी तरी पाहिजे. ”

गणपत पाटील म्हणाले, “ आता कचेरीत जाणाराला, श्रीपतकाका म्हणतात तसा कपडा लागतो. आम्ही आता लंगोटी घालून गेलो तर आम्हाला जग हसेल की ! ”

सर्व मंडळी पाटलाकडे पाहून हसू लागली.

इतक्यात पिपाजी मांग म्हणाला,

“ मी तुमास्नी सांगतो, एक चांगला उपाव ! कपड्यालत्त्यापुरते पैसे मी तुमाला देतोय. मी सांगतुया तसं करताया का तुमी ? ”

“ सांग, सांग, पिराजी. ” सगळे म्हणाले.

पिराजी म्हणाला, “ मी काय नवं सांगणार है ? तुमास्नी ठावं है कीं ! ”

एक शेतकरी जोराने म्हणाला, “ आमास्नी ठाव है म्हणतुयास, पन तुजा उपाव सांग अगूदर ! पटला तर तोबी करून पाहू. उगा मोगम बोलू नगस. ”

अनुक्रम २१७५१
विषय बालवाङ्मय
क्रमांक ७०३४
नों. दि. १५/१२/५७

पिराजी बोलू लागला, "तुमास्नी दोरखंडं लागत्याती. आमापासनं तुमी ती घेता राव! पन त्येला घायपात लागतो. तो आमी इकत आनूनशान त्येचा वाक बनवितो. आन् मंग दोरखंडं, दावं, शिकं असं कायबी बनवितो. तुमास्नी इकतो. नाहीतर हा माल बाजारातबी नेतो. त्याला बाजारात चांगल पैसे येत्याती. आन आमचीं पोटं भरत्याती."

इतके बोलून पिराजी थांबला, तेव्हां गणपत पाटील म्हणाले,

"पिराजी तुझं म्हणणं कळलं नाही मला. घायाळ विकत घेण्यासाठी तुला पैसे लागतात. त्यासाठी आगाऊ आमच्याकडून तू पैसे नेत असतोस कीं! तुला कसली नड पडू देत नाही ना आम्ही ?"

पिराजी नम्रपणे म्हणाला, "पाटील, माजं म्हननं तसं नव्हं. जरा ऐकून घ्या तरी! मी असं म्हनतो, आपल्या गावात कुठं कुठं घायपात हाय. पन तो फार थोडा हाय. आता जिमिनीला तुमी ताली घातल्याती. त्या तालीच्या बुंधाशी ओलबी राहाती राव. तवा तालीच्या कडेला समद्यानी घायाळ लावलं, तर ते चांगल माजेल आन दोन तीन वर्सात लई पैसे देईल ते तुमाला."

तुकाराम म्हणाला, " पिराजी म्हणतो ते खरं आहे. मला श्रीपतरावानी जमीन दिलीय. तिथं थोडं घायाळ आहे. ते आतां चांगलं वाढलं आहे. "

एक वृद्ध शेतकरी म्हणाला,

" पन त्येचं इतकं बेणं कुठुनशान आनावं र पिराजी ! सांग उपाव आमाला. "

पिराजी आनंदाने उद्गारला,

" मी आनून देतो बेणं. केकताड वाढलं म्हंजे कापायचा मक्ता द्या मला. त्यातनं रोपट्याचं पैसे मी कापून देईन. घायाळ मला देत जा. माजाबी धंदा जोरात चालल, तुमालाबी किंमत मिळल ! "

पाटील जरा संशयाने म्हणाले,

" पिराजी तुला मी विचारतो कीं, इतका पैशाचा माल असताना शेजारच्या गांवचे लोक असं का करीत नाहीत ? "

पिराजी सांगू लागला, " त्याचं असं हाय. घायपाताच्या बुंध्याला थोडी ओल राहिली, तर ते जोरानं वाढत. तुमी ताली घातल्यात. त्या तालीच्या पायथ्याला घायपात लावायचं. तत ओलबी हाय. आंत केकताड वाढल म्हंजे तालीनाबी आदार होईल. दोनी काम व्हतील."


श्रीपतराव गंभीरपणें म्हणाले, " पिराजी सांगतो ते खरे आहे. आम्ही बडोद्याकडे असे प्रयोग केले आहेत. ताली घातल्यामुळे हा फायदा होणार आहे. आताच निश्चय करू या. पावसाळ्याच्या सुरवातीस पेरणी होईल, त्यानंतर कांही दिवस सवड असते. त्यावेळी केकताड म्हणजेच घायपात याचीही लागवड करू. पिराजी मदत करीत आहे. जर घायपात चांगला वाढला तर पिराजी सारख्याचा धंदा जोरात चालेल आणि आपलाही फायदा होईल ! "

पिराजीच्या वाड्यातलि एसाजी म्हणाला," अवो, तरडगावात आमची घरं दहा बारा होतीं. आमचा धंदा चालना म्हणूनशान आमची माणसं बाहेरगांवी गेली. आमाला चांगलं घायाळ मिळालं तर आमी त्याचा वाक काढूं आन दोर वळू मंग आमची बाहेर गावीं गेलेली मानसंबी परत तरडगावी येतील. तुमी ताली घातल्या म्हनूनशान हाबी धंदा चांगला चालल आपल्या गावात ! "

श्रीपतरावांच्या संमतीने चालू हंगामात घायपाताची लागण करण्याचा सगळ्यांचा निश्चय झाला.

तेव्हां गणपत पाटील म्हणाले, " श्रीपतराव-काका बडोदे संस्थानातून मोकळे झाले आहेत आणि

ते तरडगावास कांही दिवस राहू लागल्यामुळे आपला फायदा होत आहे. आपल्या गावी पिकाची आणेवारी बारा आण्यापासून रुपयापर्यंत लागू लागली आहे. घायपात लावण्यानं दोन पैसे येऊ लागतील, पण ते वाढण्याला दोन तीन वर्षे लागतील. मग मात्र घायपाताचं उत्पन्न चांगलं येईल. प्रत्येक शेतात वाढलेले घायपात पिराजी, येसाजी कापीत आहेत त्यांची बायकामुलें



दोरखंडे पिळण्याचा धंदा करीत आहेत, असे आपणाला दिसू लागेल. मी एका साधूचे वचन वाचलं आहे त्यांत. ते म्हणतात. ‘ यत्न तो देव जाणावा ’

कष्ट म्हणजे यत्न हाच देव आहे असं आपण मानू या.

शेवटी श्रीपतरावानी सर्वांना पानसुपारी दिली आणि ते म्हणाले,

" आपल्याला आणखी काही गोष्टींची माहिती करून घ्यावयाची आहे. उद्या सकाळी माझ्याकडे पाहुणे येणार आहेत. तेही मोठे शेतकरी आहेत. तरी उद्या रात्री आपण असेच जमू या आणि पाहुण्यांचे अनुभव ऐकून घेऊ या.

त्यानंतर सर्व मंडळी उल्हासाने उठली.

---

## ३. आनंदरावांचा सल्ला

दुसऱ्या दिवशी सांगलीच्या बाजूचे आनंदराव पाटील श्रीपतरावाकडे आले. श्रीपतरावानी पाहुण्याना आपल्या गावची शेती आणि नवीन घातलेल्या तालीमुळे झालेला फायदा यांची माहिती सांगितली. त्यानी तरडगावच्या लोकांच्या श्रमदानाने झालेले काम प्रत्यक्ष पाहून समाधान प्रगट केले.

त्यावेळी आनंदराव श्रीपतरावाना म्हणाले, " आपल्या लोकानी एकजुटीने काम केले, तर पोटाला भरपूर मिळेल. पण बहुतेक गावी एकजूट होऊन सहकार्य होणे कठीण पडते. तुमचा गाव याला अपवाद आहे. '

श्रीपतराव म्हणाले, “ गरज पडली म्हणजे एकजूट होते. त्यासाठी थोडी झीजही सोसावी लागते. लोक श्रमदानास तयार झाले, याचे कारण त्याना माझे सांगणे पटले. शिवाय काम चालू असता त्याच्या पोटापाण्याची सोय मला करता आली. आपल्यात श्रम करण्याचे सामर्थ्य आहे. पण आळस फार आहे. यत्न म्हणजेच देव हे त्याना पटले, तर त्याना भाग्याचे दिवस आल्याशिवाय राहाणार नाहीत. ”

आनंदराव म्हणाले, “ आपण सांगता ते बरोबर आहे. जमिनीची सेवा करण्यात एकजुटीने श्रम केले, तर अद्याप सोने पिकेल अशी जमीन आपल्याकडे आहे. मी सरकारी नोकरी सोडून घरी जमीन करू लागलो, यामुळे मला जमिनीचा मोठेपणा पटला. माझ्या शेतात मुबलक धान्य पिकते, याचे कारण मीही शेतात ताली-तुली घातल्या आहेत. खते घालून चांगली मशागत करीत आहे. बहुतेक जमीन कोरडवाहू असून ती ही मध्यम प्रकारची आहे, पण तीत युक्तीने पिके काढतो, त्यामुळे मला धान्य आणि पैसा भरपूर मिळतो. ”

तरडगावच्या लोकानी पायाळ लावण्याची योजना ठरविल्याचे श्रीपतरावांनी आनंदरावाना सांगितले, त्या वेळी ते म्हणाले, “ योग्य मार्गाने तुमचे

काम चाललेले दिसते. पण इतर पिकाबरोबर दरसाल हमखास पैसा देईल, असेही पीक तुम्हाला करता येण्यासारखे आहे. तुमच्या जमिनीत दोन प्रकार दिसतात. एक प्रकार काळ्या जमिनीचा, तीत जोंधळा चांगला पिकेल. बेवड केल्याने इतरही पिके निघतील. पण तांबूस जमिनीत पैसे देणारी पिके तुमच्याकडे दिसत नाहीत."

श्रीपतराव म्हणाले, "तुम्ही शेतीचे जाणते आहात. त्यामुळे तुम्ही सांगता तसे आम्ही करू. तुम्ही आपले विचार आमच्या गावच्या लोकाना सांगाल, तर फार उपकार होतील."

श्रीपतरावानी आपल्या वाड्यात रात्री गावच्या लोकाना जमविले. त्या लोकाना आनंदरावांची ओळख करून देताना श्रीपतराव म्हणाले, "आनंदराव हे स्वतः शेती कसत असून, त्यांची शेती फायदेशीर झालेली आहे. ते स्वतःचे अनुभव तुम्हाला सांगतील. त्यासंबंधी खुलासा करून घेण्यासाठी तुम्ही प्रश्न विचारले, तर ते त्यांची उत्तरेही देतील."

तुकाराम म्हणाला, "सांगू द्या त्याना आपली माहिती. आम्ही त्याना कांही विचारले तर ते उत्तर देतील. आम्ही अडाणी असल्यामुळे विचारण्यात काही चूक झाली तर पाहुण्यानी आम्हाला माफी करावी."

आनंदराव म्हणाले, "मी तुमच्यातलाच शेतकरी आहे. स्वतः नांगरट करतो. पेरणी, काढणी करतो. स्वतः कष्ट करतो, म्हणून पोराबाळांची पोटे भरतो. चार जनावरानाही पोसतो. तुम्ही कांहीही विचारा."

गणपत पाटील म्हणाले, "दोन वर्षे झाली. आम्ही शिवारात सर्व ठिकाणी ताली घातल्या. त्यामुळे आमचा गाव दुष्काळी होता तो सुकाळी झाला. शेतातील जोंधळा बाजरी आमच्या घरात येते. पण तेवढ्यात आमच्या गरजा भागत नाहीत. म्हणून आणखी कांही तरी केले पाहिजे, असे आम्हाला वाटते. पण काय करावे ते नेमके आम्हाला समजत नाही. आमची जमीन कोरडवाहू आहे."

आनंदराव म्हणाले, "मी श्रीपतरावाबरोबर फिरून तुमचे शिवार पाहिले आहे. तुम्ही काळ्या जमिनीत जोंधळा पेरा आणि तांबसर जमिनीत दुसरी पिके काढा. त्यासाठी मधून मधून आणखी ताली घरून जमीन सपाट होईल असे करा."

एक शेतकरी बोलला, "तांबूस जमीनीत आम्ही राळा, मटकी पेरतो. पण पावसानं ओढ दिली कीं, ती माळावरची पिकं करपतात पण तुमी म्हनता तशा आणखी मधून मधून ताली घातल्या, तर मातर ततं पाणी राहील आन पीक येईल."

आनंदराव म्हणाले, " बरोबर आहे तुमचे म्हणणे. पण राळ्यापेक्षा उपटया भुईमूग तुम्हाला चांगला फायद्यात पडेल. आमच्याकडे ते पीक चांगले येते. सांगलीत त्याला गिऱ्हाइक फार आहे. डोंगरासारखे ढीगच्या ढीग तेथे पडलेले दिसतात. "

गणपत पाटील म्हणाले, " सांगलीत आणि कऱ्हाडात भुईमुगाच्या शेंगा विक्रीला फार येतात, मीही तेथे त्यांचे डोंगरासारखे ढीग पाहिले आहेत.' आमच्या शेतांत मी थोडा भुईमूग लावतो. पोराबाळांना खाण्याला शेंगा भरपूर होतात आम्हांला. "

आनंदराव बोलू लागले, " बरोबर आहे पाटील तुमचे म्हणणे. आम्ही देखील शेंगा पिकल्या म्हणजे खाण्यासाठी घरी ठेवतोच. पण ज्या जास्त शेंगा पिकतात त्या बाजारात विकतो. त्यामुळे हातात रोकड येते. तिसरा हिस्सा जमिनीत माझा भुईमूग असतो. मेंढरे बसवून त्यांचे खत होते. मीही बकरी व मेंढ्या पाळल्या आहेत. त्यांचा उपयोग खताच्या कामी होतोच आणि आणखी काय उपयोग होतो ते तुम्हाला मी सांगू कशाला ? तुम्ही जाणताच "

श्रीपतराव बोलू लागले, " आनंदरावानी सांगितलेली माहिती चांगली आहे. आपण या वर्षी घायाळ

लावणार आहोत. त्याप्रमाणे आणखी तालीतुली धरून येत्या पावसाळ्यात भुईमूग लावू या. त्याचे बेणे मी तुम्हाला आनंदरावांच्या गावातून आणून देईन. शेंग पिकली म्हणजे बियांच्या शेंगा परत करा, म्हणजे झाले."

सारे शेतकरी एकदम "होय, होय" असे आनंदाने म्हणाले.

नंतर आनंदराव म्हणाले,

"जुनी भुईमुगाच्या पेरणीची रीत, जोंधळा पेरतात तशीच आहे. पण आम्ही त्यात आता सुधारणा केलेली आहे. वीत वीत अंतरावर आम्ही शेंगदाणा टोकतो, त्यामुळें वेल पोसण्यास आणि शेंगा धरण्यास फार मदत होते. पीकही चांगले येते. तुमच्या गावचे चार पाच जण आमचेकडे येतील, तर त्याना भुईमुगाचे बी पेरण्याची रीतही सांगेन–शिकवीन. आमची पेरणी आटोपली कीं, मीच स्वतः तुमच्या गावी येऊन पेरणी होईपर्यंत राहीन. मग तर झाले!"

पाहुण्यांच्या या बोलण्याने तरडगावच्या शेतकऱ्याना आनंद झाला. पानसुपारी दिल्यानंतर सर्वजण खूष होऊन पाहुण्यांची वाखाणणी करीत घरी परतले!

आपापल्या जमिनीत आणखी कोठे ताली घाला-वयाच्या व भुईमूग कोठे पेरावयाचा याची चर्चा दुसरे

दिवसापासून सुरू झाली. श्रीपतरावांच्या विचाराने सर्व काही करण्याचा त्यांनी निश्चय केला.

न. प्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र ... नों. दि ..
वि. ........ क्र. ........

## ४. पिराजीचे गाणे

दोन तीन महिने तरडगावच्या लोकानी श्रम करून नवीन पिकासाठी जमिनी तयार केल्या. श्रीपतरावानी सर्वांना सोईची अशी श्रमदानाची योजना तयार केली.

एकाद्याचे शेत लहान असल्यास तेथे किती माणसानी किती दिवस काम केले, याची नोंद ते नावनिशीवार करून ठेवू लागले. त्याचप्रमाणे एकाद्याचे शेत मोठे असल्यास त्या ठिकाणीही किती माणसांचे काम झाले, याचीही नोंद ते करू लागले.

सर्व कामे पुरी झाल्यावर कोणी कोणाच्या शेतात किती दिवस काम केले. त्यातले त्याच्या स्वतःच्या शेतातले किती मजुरांचे काम झाले, याची वजावाट करून कोणी कोणाला सुगी झाल्यानंतर किती मोबदला द्यावयाचा हेही त्यानी ठरविले,

सर्वांची समजूत पटेल अशा प्रकारे त्यानी हिशेब

केला. त्यामुळे जो तो खूष होऊन गेला. यालाच श्रीपतरावानी मजुरांची बँक असे नाव दिले. हे बँकेचे काम गणपत पाटलाना श्रीपतरावानी समजावून दिल्यामुळे ते काम पाटील बिनचूक करू लागले. ही मजुरांची बँक बाराही महिने चालावी, अशी योजना श्रीपतरावानी पुढे केली.

त्यावर्षी तरडगावच्या बाजूस पाऊसही वेळेवर पडला. पिराजीच्या लोकानी तालीच्या कडेला घायपात लावण्याची योजना केली. त्यानी दूरच्या ठिकाणाहून रोपटी आणली आणि तालीकडेला रोपटी लावण्याचे काम आपल्या वाड्यातील पुरुष, बायका व मुले यांच्याकडून करवून घेतले.

मजुरांच्या बँकेत त्यांच्या मजुरीची नोंद झाली. पुढे सुगीच्या वेळी किंवा घायाळ कापण्याच्या वेळी ती मजुरी मजुरांच्या बँकेतून मिळेल, असे श्रीपतरावानी त्याना सांगितले. श्रीपतरावाच्या शब्दावर त्यांचा विश्वास असल्यामुळे त्याना ती गोष्ट मान्य झाली.

घायपात लावताना पिराजीने रचलेले गाणे सर्व जण म्हणत होते. लहान मुले त्या गाण्याला पितळीवर ताल धरीत होती.

गाणें—

समदं आपुन लावू या लावू या ।
घायाळाची रोपं आतां लावू या ॥
त्याचं दोरखंड वळू या वळू या ।
आपुन पैसे मिळवू या मिळवू या ॥

हें गाणे ऐकून श्रीपतराव पिराजीला म्हणाले, "पिराजी, घायाळ लावल्याबरोबर ताबडतोब पैसे मिळतात का रे ?"

पिराजी हसत हसत म्हणाला, "धनीसाब, अवो, आज नाई तर उद्या आमालाच तुमी घायाळ देनार ना ? मग आमी त्याचं पैसे करणार ! आजपासून त्या पैशाकडं आमची नजर हाय. मानसानं लांबवर नजर ठेवावी, असं आमचं बापजाद सांगत्याती ना ?"

पिराजीच्या शब्दात साधे पण व्यवहारी तत्त्वज्ञान होते.

ज्वारी बाजरीचे पेरे झाले. त्याबरोबरच भुईमूग टोकण्याचेही काम सुरू झाले.

बायकामुलाना ते काम मजेचे वाटले. आनंदराव तरडगावात येऊन पेरणी कशी करावयाची ते स्वतः दाखवीत होते. श्रीपतरावही स्वतः काम करीत होते त्यामुळे लोकात उत्साह उत्पन्न झालेला होता.

मनापासून आईची म्हणजे शेतीची जोपासना केली म्हणजे कसा फायदा होतो. हे त्यांच्या अनुभवास



आले होते. शेताना ताली घातल्यामुळे आणि शेतात मेंढरे बसविल्यामुळे गेली दोन वर्षे भरपूर धान्य उत्पन्न झाले होते. त्यामुळे त्याना पोटभर भाकरी तुकडा खावयास मिळत होता. भरल्यापोटी ते लोक पुढच्या प्रगतीच्या ओढीने काम करीत होते.

भुईमुगाची पेरणी झाल्यानंतर आनंदराव आपल्या गावी जाण्यास निघाले. त्यावेळी त्याच्या सन्मानासाठी गावकऱ्यांनी पुरणपोळीचे जेवण केले. सर्वांची तोंडे गोड झाली.

# ५. भुईमूग चांगला पिकला

आळस टाकून प्रयत्न करणारांच्या पाठीशीं परमेश्वर असतो ही गोष्ट नंतर चांगली अनुभवास आली. मृग नक्षत्र लागल्या पासून पाऊस पडू लागला. त्यावर्षी पावसाने थोडी ओढ दिली होती. परंतु पुष्य नक्षत्राचा पाऊस चांगला झाला. त्यामुळे भुईमूग चांगला पोसला.

भुईमुगाच्या वेलाची पिवळी फुले जिकडे तिकडे दिसू लागली नांगरून कुळवून जमीन मऊ झालेली असल्यामुळे शेंग जमिनीत जोमदारपणे वाढू लागली.

भुईमुगाचे जोमदार पीक पाहून गावच्या लोकाना समाधान वाटले. आता आपल्या गावी चांगली शेंग पिकणार आणि त्या शेंगेला भावही चांगला येणार असे तरडगावचे लोक म्हणू लागले.

शेंगांच्या पैशाची सोय होईल, असा अंदाज आल्यामुळे गावचे लोक मुलामुलींच्या लग्नाकार्याच्या वाटाघाटी कशा करावयाच्या याचीही तयारी करू लागले.

भुईमुगाची लागण झाल्यानंतर श्रीपतराव बडोद्यास गेले होते. तिकडेही त्यांची महत्त्वाची कामे असल्यामुळे तीन चार महिने त्याना तरडगावी येण्यास सवड नव्हती. गणपत पाटील त्याना पत्र पाठवून हकीकत कळवीत होते. पाटलांचे एक पत्र पुढे दिले आहे.

श्री. श्रीपतराव काका,

बडोदे, यासी

स. न. वि. वि.

आपल्या उपदेशाप्रमाणे यंदा भुईमुगाचे पीक गावच्या लोकांनीं मोठ्या प्रमाणात केले. चालू साली पाऊसही वेळेवर पडल्यामुळे भुईमुगाचे पीक जोरात आले. लोक आनंदात आहेत.

शेंगांची काढणी आता लवकरच होईल. वेल उपटला की त्याच्या बुंधाशी असलेले शेंगांचे जाळेच



जाळे दिसते ! शेंगांचे पीक काढण्याचे काम कांही शेतात सुरूही झालेले आहे. वेलाच्या शेंगा तोडण्यास मजूरही कमी पडू लागले आहेत. शेजारच्या गावच्या बायका हे काम करण्यासाठी येत आहेत.

शेंगा विकत घेणारे व्यापारी घिरट्या घालू लागले आहेत. ओल्या शेंगांची देखील हे व्यापारी खरेदी करतात. दोन पैसे हाती पडतात, असे दिसल्यामुळे कित्येक शेतकऱ्यानी शेंगा विकत देण्याचे करारही व्यापाऱ्याशी केलेले आहेत.

मला वाटते, अशी घाई करण्यात शेतकऱ्यांचे थोडे नुकसान आहे. आपण येथे असता तर इतकी घाई लोकानी केली नसती. आपण सवडीने यावे.

तुमच्या शेतातील शेंगा न विकता त्या वाळवून ठेवीत आहोत.

श्रुत होय ही विज्ञापना

आपला

गणपत पाटील

हे पत्र पावताच श्रीपतरावानी ताबडतोब उत्तर पाठविले. त्यात त्यानी लिहिले होते कीं "पैशाची टंचाई पडल्यामुळे लोक शेंगा विकण्याची घाई करीत असतील हे साहजिक आहे. त्यात त्यांचे नुकसान आहे, हे त्याना अनुभवाने समजून येईल. अनुभव हाच गुरु असतो ही गोष्ट लक्षात ठेवा. चालू साली लोक विशेष

आनंदात असल्यामुळे त्याना आता उपदेश तितकासा आवडणार नाही. पुढील वर्षी लोकांच्या फायद्याची दुसरी योजना आपणास ठरविता येईलच."

या उत्तरानंतर गणपत पाटलानी विशेष हालचाल केली नाही.

---

## ६. नव्या नव्या सुधारणा

शेंगांचे पीक निघत असता त्याच्या वेलाचा चारा शेतकऱ्यांच्या जनावराना मिळत होताच. त्यातूनही उरलेल्या वेलांचे शेतकऱ्यानी भूस करून ठेविले.

त्यानंतर ज्वारीची काढणी झाली. गावच्या लोकानी एकमेकाशी सहकार्य करून सर्व कामे झटपट उरकली. ज्वारी व इतर पिके मनासारखी आल्यामुळे शेतकऱ्यात समाधान पसरले होते.

श्रीपतराव व आनंदरावानी उपदेश केल्याप्रमाणे कांही शेतकऱ्यानी मेंढरे पाळलेली होती. शेतात पाला-पाचोळा भरपूर पडलेला असल्यामुळे मेंढराना ते खाणे मुबलक होते.

ही संधि साधून कित्येकानी पुढील मशागतीची

तयारी चालविली. कांहींनी आपल्या शेतात मेंढरे बसविली.



घायाळास चांगले कोंब फुटून त्याना टवटवी आलेली होती. एक दोन वर्षात घायाळही जोमाने वाढेल आणि त्याचे उत्पन्न हातीं पडेल, असे गावकऱ्याना वाटू लागले.

सुगी संपल्यानंतर कांहीं दिवसानी श्रीपतराव तरडगावी आले त्यावेळी लोक आनंदात असून लग्नाकार्याच्या विचारात गुंतले होते !

तरडगाव दुष्काळी गाव असल्यामुळे त्या गावी मुली देण्यास परगावचे लोक चुळबूळ करीत असत ! मुंबई, सोलापूरच्या गिरणीत काम करणाऱ्या मुलांची लग्ने

झटपट होत असत. शेतकरी तरुणांची लग्ने होण्याची मारामार पडत असे.

पण आता तरडगावची पिके पाहून तेथे मुली देण्यास हरकत नाही, असे शेजारच्या गावच्या लोकाना वाटू लागले. हा लोकांच्या विचारात झालेला बदल श्रीपतरावाना संतोषकारक वाटला.


लोकाना सारखे कामात गुंतविले पाहिजे, असे श्रीपतरावाना वाटत असे. त्यासाठी लोकाना उदाहरण पाहावयास मिळावे यासाठी आपल्या वाड्यातील मोकळ्या जागेत त्यानी कोंबड्या पाळण्याची खुराडी तयार केली.

त्या खुराड्यात कोंबड्यांची पिले तयार होऊ लागली. ती बाळगण्यास जो कोणी शेतकरी तयार होईल त्याला ते देऊ लागले.

कोंबड्यांची जोपासना केली म्हणजे त्यापासून पुष्कळ फायदे होतात, हे त्या लोकाना पटू लागले. कोंबड्याना रोग होऊ नये. यासाठी काळजी कशी घ्यावी, याचीही माहिती श्रीपतरावांचे स्नेही आनंदराव यानी लोकाना करून दिली.

सुगीच्या दिवसात लोक शेतातच राहात असत.

आता शेतातील कामे वाढल्यामुळे काही शेतकरी शेतातच झोपड्या घालून वस्ती करू लागले.



जोंधळ्याची खुडणी करताना कांही धान्य जमिनीवर पडे, ते कोंबड्या वेचून खात असत. मळणी करताना जे धान्य खळ्याच्या कडेला किंवा खळ्याच्या बाहेर उडून जात असे, ते धान्य कोंबड्या वेचून खात.

कोंबड्यांची अंडी नेहमी मिळत असल्यामुळे त्यांची विक्री होऊन शेतकऱ्याना दोन पैसे मिळू लागले. शिवाय त्यांचा उपयोग खाण्यासाठीही होऊ लागला.

अशा प्रकारे लोकाना एक नवीन धंदा मिळाला.

भुईमुगापासून पैसे निर्माण होऊ लागले. त्यामुळे कपडालत्ता, तेल, मीठ याना पैशाची टंचाई पडेनाशी झाली. ज्यानी कोंबड्या पाळल्या त्याना फायदा झाला.

आता मुंबई सोलापूरकडे गेलेले तरुण तरडगावास येऊन शेती करू लागले. त्यामुळे श्रीपतरावाना

बरे वाटले. लोकांची पोटापाण्याची सोय झाली, एवढ्यानेच श्रीपतरावाना समाधान वाटत नव्हते.

अद्यापि तरडगावास शाळा नव्हती. श्रीपतरावांचा वाडा मोठा होता. त्यानी तेथे शाळेसाठी जागेची सोय करून दिली. जागेची सोय झाल्याने तेथे बोर्डाने शाळा सुरू केली.

शाळेचे शिक्षक चांगले असले म्हणजे गावची सुधारणा होण्यास मदत होते. तेव्हां श्रीपतरावानी ती काळजी घेऊन चांगले शिक्षक मिळाविले. त्यामुळे तरडगावच्या सुधारणेचे काम सोपे झाले.

लोकाना कापड चोपड बाहेरून आणावे लागते. त्यात त्यांचा पैसा अधिक खर्च होतो. शेंगांची खरेदी व्यापारी करतात, त्यातही शेतकऱ्यांचे नुकसान होते. तेव्हां सर्व बाबतीत गावच्या लोकांचा फायदा होण्यासाठी काय काय करावे, याची योजना श्रीपतरावानी गावात नवीन आलेल्या शाळेच्या गुरुजींच्या संमतीने ठरविली. ती कशी अमलात आली व त्यापासून लोकांचा फायदा कसा झाला ते पुढील भागात पाहू.

IRBK-0106248
IRBK-0106248
अनुक्रम 2-9-78-५९
विभाग बालवाङ्मय
७५४
९५१२८५२

# रामतनय यांचें वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १. **मोहित्यांची मंजुळा** (आवृत्ति दुसरी) गाजलेली सामाजिक कादंबरी | ४ | रु. |
| २. **खरा उद्धार** (मोठी चौथी आवृत्ति छापत आहे) ग्रामीण जीवनावरील अत्यंत उद्बोधक कादंबरी | ३ | ,, |
| ३. **साखर गोटी** १९४२ च्या चळवळीवरील अत्यंत गोड कादंबरी | ५ | ,, |
| ४. **तिघी जणी** ( दुसरी आवृत्ति छापत आहे ) आंतरराष्ट्रीय राजकारणावरील उद्बोधक कादंबरी | ३ | ,, |
| ५. **प्रमिला बेन** महात्माजींच्या तत्त्वज्ञानावरील उत्कृष्ट कादंबरी | ४ | ,, |
| ६. **तापीतीरीं** अत्यंत गाजलेली राजकीय कादंबरी | ५ | ,, |

## विद्यार्थ्यांसाठीं व प्रौढांसाठीं

| | | |
|---|---|---|
| ७. **कॅप्टन प्रताप** भाग १ ला (सुधारलेली तिसरी आवृत्ति ) | १॥ | ,, |
| ८. **कॅप्टन प्रताप** भाग २ रा (सुधारलेली दुसरी आवृत्ति) | २ | ,, |
| ९. **कॅप्टन प्रताप** भाग ३ रा (छापत आहे) | २ | ,, |
| १०. **गजाभाऊ** ( श्रेष्ठ प्रतीचें सांस्कृतिक ग्रामीणजीवन ) | १॥ | ,, |
| ११. **खरा उद्धार** (सुधारलेली सचित्र सातवी आवृत्ति) | ३ | ,, |
| १२. **बाळू नि बगडी** (दुसरी आवृत्ति छापत आहे ) | ८ | आणे |

---

रामतनय, ४६४ नारायण पेठ, पुणें २.